पुण्यनगरी दि 13/02/2023

# लूटमार करणारे तिघे जेरबंद



**नांदेड / प्रतिनिधी**

उस्माननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लूटमारी प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक करण्यात यश मिळविले आहे. या तिघांना १४ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे.

उस्माननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत काही दिवसांपूर्वी लुटमारीची घटना घडली होती. या प्रकरणी उस्माननगर ठाण्यात गुरनं १२/२३ कलम ३९२, ३४ दाखल करण्यात आला होता. या घटनेनंतर उस्माननगर पोलिसांवर टीकेची झोड उठली होती. या प्रकरणाचा तपास करीत पोलिसांनी सूरज शंकर सोनटक्के (२२ कुंभारगल्ली नांदेड), शेख समी ऊर्फ अरबाज शेख रौफ (२२ रा. असद कॉलनी गाडेगाव रोड नांदेड) आणि पंढरी कोंडीबा पवार (३८ रा.रुई ता.नायगाव) यांना अटक करुन लोहा न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना १४ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. हे आरोपी रेकॉर्डवरील आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून इतर गुन्हेही उघडकीस येण्याची शक्यता आहे. उपनिरीक्षक केंद्रे पुढील तपास करीत आहेत.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधीक्षक अविनाश कुमार, कंधारचे उपविभागीय पोलिस अधिकारी मारोती थोरात, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पांडुरंग भारती, उपनिरीक्षक काळे, केंद्रे,पोकॉ शेख जावेद, गंगूलवार,सूर्यवंशी, कानगूले, मस्के, जायभये, टेकाळे, चालक बलवान कांबळे यांनी ही कारवाई केली.